सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण**

एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर आळी, पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-४००६०१,

E-MAIL ID –lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२५३४३५६७


---

**प्रेस नोट क्र. १५** **दिनांक :- ०५/०४/२०२४**

# आगामी लोकसभा निवडणुकीचे अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांची अवैध गावठी दारु हातभट्टीवर कारवाई करत एकुण २,५५,०००/- रु किंमतीचा मुद्देमाल जप्त

मा. श्री. डॉ. डी. एस. स्वामी, पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण तसेच श्रीमती डॉ. दिपाली धाटे, अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी ठाणे ग्रामीण आगामी लोकसभा निवडणुकीचे अनुषंगाने जिल्हा पोलीस दलाच्या कार्यक्षेत्रा मधील अवैध दारु, जुगार, अंमली पदार्थ तसेच मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणणे कामी व त्यास प्रतिबंध करणेकामी सुचना दिलेल्या होत्या त्यानुसार श्री. सुरेश मनोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांनी जिल्हयात अशा प्रकारचे अवैध धंदे, जुगार यांचेबाबत माहिती मिळवुन कारवाई करणेकामी वेग-वेगळे पथक तयार करुन त्यांना मार्गदर्श केले.

मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व आदेशाप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेच्या भिवंडी युनिट पथकाला दिनांक ०५/०४/२०२४ रोजी भिवंडी पोलीस ठाणे हद्दीमध्ये कालवार गावात राहणारा बाळाराम शंकर म्हात्रे हा कालवार गावाकडुन केवणी दिवा गावाकडे जाणा-या खाडी लगतच्या कच्चा रोड पासुन काहि अंतरावर जंगलात गावठी हातभट्टीची दारु बनवितो अशी खात्रीशीर माहिती मिळाली सदर ठिकाणी छापा टाकला असता सदर ठिकाणी गावठी हातभट्टीची दारु बनविण्याचे उपयोगाचे ३० प्लस्टिक व लोखंडी ड्रम त्यात प्रत्येकी २०० लिटर गुळ नवसागर मिश्रीत रसायने भरलेले असा एकुण ६००० लिटर रसायन व एक लोखंडी ढोल गावठी हातभट्टीची दारु बनविण्यासाठी उपयोगाचा किंमत सुमारे २०००/- रु असे एकुण २,५५,०००/- रु किमंतीचा मुद्देमाल मिळुन आला असुन, पुढील तपास भिवंडी ता. पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक, श्री. डी. एस. स्वामी तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक, श्रीमती दिपाली धाटे यांनी दिलेल्या आदेश व सुचना प्रमाणे श्री. सुरेश मनोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे भिवंडी युनिट मधील सपोनि/राजकुमार पोवार, पोहवा/१५४२ उमेश ठाकरे, पोहवा/२६७ हनुमान गायकर, पोहवा/४८८ सुहास सोनावणे, पोना/३०१२ योगेश शेळकंदे, पोना/१७२१ जितेंद्र वारके या पथकाने कौशल्यपुर्ण उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

*************************************************************************